कोणत्याही झेंड्याची कोणालाच अडचण,तक्रार नाही

जिल्हाधिकारी,पोलीस अधिक्षक,मुख्याधिकारी साहेब,असा कोणता संवेदनशील प्रश्न उपस्थित झाला

रात्री १२ वाजता निळे झेंडे काढले

निळ्या झेंड्याबद्दल एवढा व्देष का?

झेंडे काढण्यासाठी आलेले कर्मचारी नशेत भीमसैनिकांना आरेरावीची भाषा

गुन्हे दाखल करून शैक्षणिक करिअर बर्बाद करण्याची पोलिसांची धमकी

डॉ.बाबासाहेब आंबेडकर विचार मंचच्या वतीने मुख्याधिकाऱ्यांना निवेदन

विद्यमान नगराध्यक्ष भीमकन्या प्रेमलताताई पारवे गप्प का?

बीड (सरकार): शिवाजीनगर पोलीस ठाणे अंतर्गत शांतता सुव्यवस्था अबाधित असताना याच पोलीस स्टेशनच्या हद्दीत विविध ठिकाणी लावलेल्या पक्ष, धर्म, पंथ यासह इतर विविध रंगाचे झेंडे लावले गेले आहेत. मात्र कधीही कोठेही ज्या समाजाचा, ज्या पंथाचा, धर्माचा कार्यक्रम असतो त्या वेळेस अगोदर लावलेले झेंडे काढण्याची माणुसकी दाखविली जाते. एवढेच नव्हे तर विविध ठिकाणी स्वच्छता राबविली जाते. मात्र रात्री बारा वाजता नगर परिषदेच्या प्रशासनात असा कोणता संवेदनशील संदेश आला आणि रात्री बारा वाजता शिवाजीनगर पोलीस स्टेशनच्या हद्दीतील निळे झेंडे काढण्यासाठी मध्यरात्री यंत्रणा कामाला लागली. त्यामुळे डॉ.बाबासाहेब आंबेडकर विचार मंचाचे भीमसैनिक यांना कळाल्यानंतर या निळ्या झेंड्यांना अथवा इतर झेंड्याबद्दल कोणी तक्रार दिली का? या झेंड्याबद्दल कोणाला काही अडचण निर्माण होतेय का? असे प्रश्न विचारल्यांनंतर पोलीस प्रशासनाकडून आरेरावीची भाषा करत गुन्हे दाखल करून शैक्षणिक करिअर बर्बाद करू अशी आरेरावीची भाषा शिवाजीनगर पोलीस स्टेशनच्या प्रमुखाकडून करण्यात आली. त्यामुळे पोलीस अधिक्षक साहेब, शहरात सर्व जाती धर्माचे लोक गुण्या गोविंदाने राहत असताना आपल्या धर्माचा, पंथाचा व विचारांचा झेंडा लावत असेल आणि त्या संदर्भात कोणाची अडचण नसेल तर हा गंभीर प्रकार कोणाच्या सांगण्यावरून कशासाठी केला याची चौकशी करावी. त्याच बरोबर नगर प्रशासनाला भीमसैनिकांनी निवेदन देऊन हा झालेला प्रकार निषेधार्ह आहे असे ठामपणे सांगितले. मात्र हा गंभीर प्रकार होत असताना विद्यमान नगराध्यक्ष भीमकन्या यावर मौन बाळगून आहेत. त्यामुळे हा केलेला

प्रकार नगर पालिकेला माहिती आहे की नाही की कोणाच्या आदेशाने हा प्रकार केला याची चौकशी झाली पाहीजे अशी भीमसैनिकांकडून चर्चा होत आहे.

बीड शहरातील छत्रापती शिवाजी महाराज चौकातील व डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकातील व सर्व बीड शहरातील लावण्यात आलेले निळे ध्वज काढले काढण्यात आले. अचानक रात्रीच्या १२.०० वाजता नगर परिषद बीड व शिवाजी नगर पोलीस स्टेशन, बीड यांच्या संयुक्त कार्यवारीने शिवाजी नगरचे पोलीस निरीक्षक शितलकुमार बल्लाळ यांच्या पोलीस बंदोबस्तात जाणीवपूर्वक निळे ध्वज दोऱ्या तोडुन काढण्यात आले, तसेच झेंडे काढण्यासाठी आलेले कर्मचारी हे मदय प्रशान करुन झंडे उतरवत होते. व जाब विचारण्यासाठी गेलेल्या भिम सैनिकांना आरेरावीची भाषा करून

गुन्हे नोंद करुत शैक्षणिक करियर बरबाद करुत अशी अरेरावीची भाषा शितलकुमार बल्लाळ यांच्याकडून करण्यात आली. तसेच शासनामार्फत शासकीय खर्चातुन ध्वज स्तंभ उभारले जातात व त्यावर देशाचा तिरंगा लावला जातो परंतू बीड नगर परिषदेने शासकीय खर्चातून जो ध्वज स्तंभ उभारलेला आहे त्यावर ध्वज स्तंभावर तिरंगा झेंडा लावायला हवा होता, परंतु असे न करता त्याठिकाणी इतर झेंडा 'लावण्यात आलेला आहे. महत्वाचे म्हणजे बीड शहरातील विविध झेंडयापैकी फक्त निळेच झेंडे काढण्यात आलेले आहेत. है जातीवाद व जातीयद्वेशातुन झालेले कृत्य आहे. त्यामुळे जर या निळ्या झेंडया विषयी कोणी तक्रार केली असले तर त्यावर अॅट्रॉसिटी अॅक्ट नुसार गुन्हा नोंद केला पाहिजे आणि जर कोणी तक्रार दिलेली नसेल तर झेंडे काढणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांच्यावर देखील अॅट्रॉसिटी अॅक्ट नगार गन्हा नोंद केला गेला पाहिजे असे न झाल्यास प्रशासनालाच जातीजाती मध्ये निर्माण करायचा की काय असा प्रश्न निर्माण होत आहे. दरम्यान, यावेळी बाळासाहेब काकडे, डोळस, अमोल अहिरे, प्रितम चक्रे, अमोल जाधव, प्रेम कांबळे, आण्णा गायकवाड, अभिजीत इंगोले, यशकुमार प्रधान, अशोक वीर, लक्ष्मण गायकवाड, धम्मानंद व इतर डॉ.बाबासाहेब आंबेडकर विचार मंचाचे पदाधिकारी उपस्थित होते.

beedsarkar

संपादक-आदोडे साहस

E-mail : beedsarkar @ Gmail.com

E-mail : beedsarkar @ Gmail.com किंमत: १ रू. पाने : ४

बीडसरकार

बीड महाराष्ट्र वर्ष १३ वे अंक ३१६ शुक्रवार ३० ऑक्टोबर २०२६ RNI NO. MAHMAR/2012/49908 पोस्टल दि.३१ ऑक्टोबर २०२६ पाने ४ किंमत १ रू.

Beed MAHARASHTRA Year 13 Issu 316 Friday 30 October 2026 RNI NO. MAHMAR/2012/49908 पोस्टल क्रं.No.L/SB/Beed/RNP-248/2025-2027

५ नोव्हेंबरपासून शाळांना दिवाळीची सुट्टी!२५ नोव्हेंबरला भरणार वर्ग

पुणे (सरकार): शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मधील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांच्या दिवाळी सुट्ट्यांबाबत जिल्हा परिषद हिंगोलीच्या शिक्षण विभागाने महत्त्वपूर्ण आदेश जारी केला आहे. हिंगोली जिल्ह्यातील सर्व व्यवस्थापनांच्या व सर्व माध्यमांच्या शाळांना ०५ नोव्हेंबर २०२६ ते २३ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत दिवाळीची सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. सुट्टीचा हा कालावधी संपल्यानंतर २५ नोव्हेंबर २०२६ पासून जिल्ह्यातील सर्व शाळा नियमितपणे सुरू होतील.

दिवाळीची सुट्टी २३ नोव्हेंबर २०२६ रोजी समाप्त होत आहे. त्यानंतर लगेचच २४ नोव्हेंबर २०२६ रोजी गुरुनानक जयंतीनिमित्त सार्वजनिक सुट्टी असल्याने, विद्यार्थी व शिक्षकांसाठी २५ नोव्हेंबर २०२६ (बुधवार) रोजी शाळा पूर्ववत सुरू करण्याचे आदेश शिक्षण विभागाने दिले आहेत. हिंगोली जिल्हा परिषदेच्या प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाधिकाऱ्यांनी जारी केलेल्या परिपत्रकात शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मधील एकूण कार्यदिवस आणि सुट्ट्यांचे सविस्तर नियोजन जाहीर केले आहे.

एकूण वार्षिक दिवस: ३६५ दिवस रविवार: ५२ दिवस अन्य सार्वजनिक सुट्ट्या: ५७ दिवस जिल्हाधिकाऱ्यांच्या अधिकारातील सुट्ट्या: ०३ दिवस संस्था/शाळा स्तरावरील सुट्ट्या: ०२ दिवस दिवाळी सुट्टी: १४ दिवस (रविवार व इतर सार्वजनिक सुट्ट्या वगळून) एकूण सुट्ट्या: १२८ दिवस अंतिम एकूण कार्यदिवस: २३७ दिवस

या नियोजनानुसार यंदाच्या शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांना व शिक्षकांना २३७ दिवस प्रत्यक्ष शैक्षणिक कामकाजासाठी मिळतील. जिल्हा परिषदेचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाधिकारी यांनी जिल्ह्यातील सर्व गटशिक्षणाधिकारी, शिक्षण विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख आणि मुख्याध्यापकांना या आदेशाची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिले आहेत. दिवाळी सुट्टीनंतर २५ नोव्हेंबर रोजी सर्व शाळांमध्ये वेळेवर कामकाज सुरू होईल, याची दक्षता घेण्यास सांगण्यात आले आहे. तसेच, शैक्षणिक वर्षातील निर्धारित २३७ कार्यदिवस पूर्ण होतील अशा पद्धतीने अध्यापनाचे व परीक्षेचे नियोजन करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत. शिक्षण विभागाच्या या स्पष्ट आदेशामुळे शाळांचे शैक्षणिक नियोजन सुरळीत होण्यास मदत होणार असून विद्यार्थी आणि पालकांनाही दिवाळीच्या सुट्ट्यांचे नियोजन करणे सुलभ होणार आहे.

बलात्कार व अॅट्रॉसिटीच्या गुन्ह्यातून तीन आरोपींची निर्दोष मुक्तता

बीड (सरकार): सदर घटनेची थोडक्यात हकीकत अशी की, फिर्यादी/पिडीतेने दि.०५-०७-२०२३ रोजी अंभोरा पोलीस स्टेशन येथे तक्रार दाखल केली की, दि.१३-०३-२०२३ रोजी ८.०० वाजण्याचे सुमारास, फिर्यादी आरोपीचे घरी उसने दिलेले तीन लाख रूपये मागणेसाठी गेली असता, आरोपीने जातीवाचक शिवीगाळ करून काठीने मारहाण केली व आरोपीने केस धरून खाली पाडले, व आरोपी जानकीराम बापु गव्हाणे याने

पळत येऊन तोंडावर लाथ मारली व तोंडावर थुंकला व 'तुझी काय औकात', असे बोलून शिवीगाळ केली व आरोपी जानकीराम याने दि.१३-०३-२०२३ पुर्वी ३ वर्षापासून 'जीवनभर सांभाळीन', असे आमिष दाखवून बलात्कार केला, अशा प्रकारची फिर्याद दाखल केली. त्यानुसार आरोपींचे विरूद्ध गु.र.नं.१२५/२०२३ कलम ३०ळ(९)(२)(पीळसार), ३२४, ३२३, ५०४, ३४ भा.दं.वि. व कलम 3(9)(w)(i)(ii) 3(2), 3(v), 3(2)(va) अॅट्रॉसिटी अॅक्ट नुसार नोंद करण्यात आला होता.सदर गुन्ह्याचा तपास करून पोलीसांनी आरोपींचे विरूद्ध दोषारोपपत्र दाखल केले. सदरील प्रकरणाची सुनावणी मा.प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, बीड यांचे न्यायालया विशेष सत्र प्रकरण क्र.१३३/२०२३ नुसार झाली. सदर प्रकरणात सरकार पक्षातर्फे एकूण सात साक्षीदार तपासण्यात आले. परंतु आरोपींचा बचाव व युक्तीवाद ऐकून सरकार पक्षाने आरोप सिद्ध न केल्यामुळे आरोपी नामे जानकीराम बापु गव्हाणे, रा.वेलतुरी, ता. आष्टी, जि. बीड व इतर दोन आरोपींची मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, श्री. सुराणा साहेब यांनी दि.२९-१०-२०२६ रोजी सबळ पुराव्या अभावी सदर प्रकरणातून निर्दोष मुक्तता केली. सदर खटल्यामधे आरोपींचे वतीने अॅड. सचिन सयाजीराव जायभाये यांनी काम पाहिले. त्यांना अॅड. अभिजीत एस. गव्हाणे व अॅड.एजाज शब्बीर मोमीन यांनी सहकार्य केले.

गोडंबीच्या बिया खाल्ल्याने सात विद्यार्थ्यांना विषबाधा

आष्टी (सरकार) तालुक्यातील रायगव्हाण येथे शाळा सुटल्यानंतर खेळतांना सात विद्यार्थ्यांनी गावातील ओढ्याच्या बाजूस असलेल्या मोगल्या गोडंबीच्या बिया खाल्याने त्यांना अचानक उलटी, जुलाब मळमळ होऊन विषबाधा झाल्याची घटना बुधवार (२८) रोजी घडली. विद्यार्थ्यांवर प्रथम आष्टी प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचार करण्यात आल्यानंतर त्यांना तातडीने जालना येथील जिल्हा रुग्णालय पाठविण्यात आले आहे.

सर्व विद्यार्थ्यांची प्रकृती धोक्याबाहेर आहे. रायगव्हाण येथे बुधवारी शाळा सुटल्यानंतर स्वराज संतोष खाडे (वय ७) रुद्र दत्तात्रय खाडे (वय १२), यशश्री सुरेश डोळके (वय ७), आरोही रवी पोटे (वय ७), यश शायस पोटे (वय ८), हनुमान ज्ञानेश्वर सोनटक्के (वय ५) व कार्तिक कृष्णा सोनटक्के (वय ४) या सर्व विद्यार्थ्यांनी गावातील ओढ्याच्या बाजूस असलेल्या मोगल्या गोडंबीच्या झाडांच्या बिया खाल्या.

त्यानंतर त्यांना उलट्या जल मलमल होऊ लागल्याने पालकांनी त्यांना रात्री तावद्रीने आटी प्राथमिक आरोरा केंटात उपचारासाठी नेले. तेथे वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रदीप राठोड यांनी त्यांच्यावर प्राथमिक उपचार करून तातडीने जिल्हा रुग्णालय जालना येथे पुढील उपचारासाठी पाठवले. जालना येथील रुग्णालयात मुलांवर उपचार सुरू असून सर्व विद्यार्थ्यांची प्रकृती धोक्याबाहेर असल्याचे आरोग्य विभागाच्या वतीने सांगण्यात आले आहे.

अंबाजोगाईत अतिक्रमण हटविण्याची मोहीम सुरू

अंबाजोगाई (सरकार): एकीकडे दुष्काळी परिस्थिती, दुसरीकडे दिवाळीचा सण तोंडावर आलेला असताना अंबाजोगाई शहरात अतिक्रमण हटविण्याच्या मोहिमेने छोट्या व्यावसायिकांचे कंबरडे मोडले आहे. छत्रपती शिवाजी महाराज चौक ते शासकीय रुग्णालय या प्रमुख मागविर रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी तब्बल ५०-५० फुटांपर्यंत अतिक्रमण हटविण्याची कारवाई सुरु करण्यात आली आहे. ऐन सणासुदीच्या काळात प्रशासनाच्या या कारवाईमुळे हातावर पोट असलेल्या छोट्या व्यावसायिकांवर उपासमारीची वेळ येण्याची भीती व्यक्त होत आहे.

विशेष म्हणजे, याच वर्षात दुसऱ्यांदा अतिक्रमण हटविण्याची मोहीम राबविण्यात येत आहे. मग यापूर्वी केलेल्या कारवाईचे पुढे काय झाले? अतिक्रमण पुन्हा कसे वाढले? आणि वारंवार कारवाई करूनही कायमस्वरुपी नियोजन का केले जात नाही? असे सवाल आता नागरिक उपस्थित करीत आहेत. मिळवा कायदेशीर

शहरातील वाहतूक सुरळीत व्हावी, रस्ते मोकळे व्हावेत, याला कोणाचाही विरोध नाही. मात्र, दुष्काळामुळे आधीच आर्थिक संकटात सापडलेल्या छोट्या व्यावसायिकांना दिवाळीच्या

तोंडावरच उद्ध्वस्त करण्याची घाई प्रशासनाला का? मोठ्या व्यावसायिकांपासून ते हातगाडीवर व्यवसाय करणाऱ्यांपर्यंत सर्वांसाठी समान निकष आहेत का? कारवाईपूर्वी पर्यायी जागा, पूर्वसूचना आणि पुनर्वसनाचा विचार झाला आहे का? असे अनेक प्रश्न या मोहिमेमुळे निर्माण झाले आहेत.

दिवाळी हा छोट्या व्यावसायिकांसाठी वर्षातील महत्त्वाचा व्यवसायाचा काळ असतो. याच काळात दुकानांसमोरील जागा आणि व्यवसायाची साधने हटवली जात असल्याने अनेकांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला आहे. शहरात अतिक्रमण हटवायचेच असेल तर त्यासाठी नियोजनबद्ध आणि सर्वांना समान न्याय देणारी भूमिका प्रशासनाने घ्यायला हवी.

प्रशासनाने एक गोष्ट लक्षात घ्यावी, रस्ते मोकळे करणे ही जबाबदारी आहे; मात्र गरीबांच्या चुली विझवून विकास साधता येत नाही!

अतिक्रमण हटविण्याच्या नावाखाली केवळ हातोडा चालविण्यापेक्षा शहराच्या वाहतुकीचा कायमस्वरुपी प्रश्न सोडविणे आणि छोट्या व्यावसायिकांच्या रोजीरोटीचा विचार करणे अधिक महत्त्वाचे आहे. अन्यथा प्रशासनाच्या या कारवाईविरोधातील नागरिकांचा असंतोष आणखी तीव्र होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

संपादकीय

पर्यावरण संरक्षणात स्त्रिया

पर्यावरण संरक्षण आणि संवर्धन क्षेत्रात महिलांनी भरीव योगदान दिलेले आहे. 'जिच्या हाती पाळण्याची दोरी, ती जग उद्धरी' असे म्हटले आहे, ते खरेच आहे. भगिनी, सखी ऊपांत वावरणारी स्त्री पर्यावरण क्षेत्रातही अग्रेसर ठरलेली आहे. राजस्थानात बिश्नोई समाजातल्या पुऊषांच्या बरोबरीने तिथल्या स्त्रियांनीही 'खेजडी' या पवित्र वृक्षांच्या संरक्षणासाठी आहुती दिलेली आहे.

अमृतादेवी बिश्नोई आणि त्यांच्या तीन मुली तसेच गावातील समविचारी अशा एकूण ३६३ जणांनी ११ सप्टेंबर १७३० रोजी राजाज्ञेविऊद्ध बंड पुकारले. नवीन राजवाड्याच्या निर्मितीसाठी चुनाभट्टी पेटविण्यास खेजडी वृक्षांची लाकडे गरजेची असल्याने, ती तोडण्यासाठी मारवाडचे राजे अभयसिंह यांनी आदेश दिला होता. राजाज्ञा अंमलात आणण्यासाठी सैनिक जोधपूर-जाडन मार्गावर असणाऱ्या खेजाडगी गावात आले. त्यावेळी अमृतादेवी आणि त्यांच्या ३६३ साथीदारांनी, 'आमचे मस्तक त्यागू, पण जिवंत असेपर्यंत खेजडी वृक्ष तोडू देणार नाही', असा निर्णय घेतला. 'खेजडी' वृक्ष तोडण्यासाठी जेव्हा सैनिक पुढे सरसावले, तेव्हा अमृतादेवी आणि त्यांच्या ध्येयवादी साथीदारांनी झाडांना मिठी मारली. 'प्राण गेले तरी बेहत्तर', असे म्हणून झाडांच्या बुध्यांना घट्ट पकडले. सैनिकांनी दया-माया न दाखविता ३६३ जणांची निर्घृणरित्या हत्या केली. जगाच्या इतिहासात वृक्ष संरक्षणासाठी हौतात्म्य पत्करण्याची ही घटना अभूतपूर्व अशीच होती.

अमृतादेवी आणि तिचे समविचारी साथीदार 'खेजडी' वृक्षाचे संरक्षण व्हावे म्हणून मृत्यूला निर्भयपणे सामोरे गेले. आपल्या आदेशानुसार सैनिकांनी 'खेजडी' वृक्ष तोडण्यासाठी अडथळे निर्माण करणाऱ्या अमृतादेवी आणि तिच्या साथीदारांची निर्घृणपणे हत्या केल्याची वार्ता जेव्हा महाराज अभयसिंह यांना समजली, तेव्हा त्यांना अतीव वेदना झाली. त्यानंतर त्यांनी जेथे जेथे बिश्नोई जमातीचे वास्तव्य असलेल्या गावोगावीच्या 'खेजडी' वृक्षांची तोड करण्यास कडक बंदी घातली. बिश्नोई समाजात ज्या कृष्ण मृगाला पवित्र मानून, त्याचे पारंपरिकरित्या रक्षण करण्यासाठी नियम केला होता, त्या कृष्ण मृगाच्या शिकारीवरती कायदेशीररित्या बंदी घातली.

पंधराव्या शतकात जन्माला आलेल्या संत जंभेश्वर यांनी राजस्थानात वृक्ष-वेली आणि पशु-पक्षी यांच्या संवर्धन आणि संरक्षणाला प्राधान्य देण्याबरोबर, भूतदया आणि मानवी मूल्यांच्या विचारधारेचा पुरस्कार करणाऱ्या बिश्नोई संप्रदायाची स्थापना केली होती. त्या संप्रदायाच्या अनुयायी असणाऱ्या अमृतादेवी आणि त्यांच्या साथीदारांनी 'खेजडी' वृक्षाच्या संरक्षणासाठी सर्वोच्च आत्मबलिदान केले. पर्यावरण संरक्षणासाठी त्याग करणाऱ्या अमृतादेवी आणि त्यांच्या कार्यकर्त्यांची स्मृती अखंड आणि अक्षय राहावी म्हणून खेजडगी गावात स्मृतीस्थळ उभारले. आज तेथे जंभेश्वर भगवान यांचे सुंदर मंदिर, अमृतादेवी यांचा पुतळा यांच्यासह कडुनिंब, खेजडी आदी वृक्षांनी समृद्ध पशु-पक्षी यांना पूर्णपणे अभय प्रदान करणारे 'स्मृतीवन' निर्माण केलेले आहे.

उत्तराखंडातल्या चमोलीत 'रेनी' या गावातल्या गौरादेवीने महिला मंगल दलाचे नेतृत्व 'चिपको' आंदोलनात १९७४च्या सुमारास करून त्यांनी जंगलतोडीला रोखले. रिया राना या स्त्रीनेसुद्धा पर्यावरण संरक्षणासाठीच्या लढ्यात आपले योगदान दिलेले आहे. उत्तराखंडातल्या डेहराडूनमध्ये वावरणाऱ्या वंदना शिवा यांनी समाजात जैविक संपदा, नैसर्गिक साधनांचा योग्यरीतीने वापर केला जावा आणि पारंपरिकरित्या कृषी व्यवसाय व्हावा आणि इथल्या पिकांचे संवर्धन व्हावे, यासाठी चळवळ उभारली. आपल्या पर्यावरणीय विचारधारेच्या समर्थनासाठी त्यांनी वीस पुस्तकांचीही निर्मिती केलेली आहे. भारताला जो जैवविविधतेचा समृद्ध वारसा लाभलेला आहे, त्याचे रक्षण व्हावे म्हणून सातत्याने प्रयत्न आरंभिलेले आहेत. त्यांच्या अभिनव अशा 'नवधान्य' चळवळीमुळे पारंपरिक वाणाच्या संचयिका देशभरात सुरू झाल्या आणि त्यामुळे बहुराष्ट्रीय कंपन्यांचे षड्यंत्र उघडकीस येण्यास मदत झाली.

मेधा पाटकर यांनी नर्मदेवरती उभ्या राहिलेल्या 'सरदार सरोवर प्रकल्पा'च्या विरोधात बुलंदपणे आवाज 'नर्मदा बचाव' आंदोलनाद्वारे उठविला. जंगलनिवासी जनजातींच्या हक्कांचे आणि पर्यावरणाच्या रक्षणासाठी त्यांनी उभारलेला लोकलढा आजही चालू आहे. मनेका गांधी यांनी 'पीपल फॉर ॲनिमल' या संस्थेच्या माध्यमातून मूक प्राण्यांवरती होणाऱ्या अन्याय-अत्याचाराला वेळोवेळी वाचा फोडलेली आहे. जनावरांविषयी समाजात आदरभाव निर्माण व्हावा म्हणून त्यांनी आपल्या वाणी आणि लेखणीद्वारे लोक जागृतीवर भर दिलेला आहे. तत्कालीन प्रधानमंत्री इंदिरा गांधी यांच्या कारकिर्दीत आपल्या देशात 'वन्यजीव संरक्षण कायदा १९७२', 'वन संवर्धन कायदा १९८०', 'पर्यावरण संरक्षण कायदा १९८६' लागू करण्यात आले. भारतात त्यांनी समर्थपणे राबविलेल्या व्याघ्र प्रकल्पामुळे नष्ट होण्याच्या वाटेवरती असलेल्या पट्टेरी वाघांच्या संरक्षणाला प्राधान्य लाभले.

विज्ञान आणि पर्यावरण केंद्राच्या प्रमुख या नात्याने वावरताना सुनीता नारायण यांनी पर्यावरण संरक्षणात विशेष योगदान दिलेले आहे. 'डाऊन टू अर्थ' या पाक्षिकाद्वारे त्यांनी देशभरातल्या पर्यावरणीय समस्यांना वाचा फोडण्याचे कार्य समर्थपणे चालविलेले आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या साहाय्याने कृषी क्षेत्रात प्रगती करण्यासाठी रासायनिक खते, कीटकनाशके, जंतुनाशके अशा घटकांच्या वारेमाप वापरामुळे जो पर्यावरणाचा ऱ्हास सुरू झाला, त्याचा उपाय करण्यासाठी अमेरिकेतल्या रेचल कार्सन यांनी, केलेल्या 'सायलेंट स्प्रिंग' या पुस्तकाने समाजातला पर्यावरणीय दृष्टिकोन विकसित होण्यासाठी क्रांतिकारी भूमिका बजाविलेली आहे. आफ्रिकेतल्या केनियासारख्या राष्ट्रात जीवशास्त्राचे अध्ययन केलेल्या वंगारी माथाई यांनी, नियोजनबद्ध वृक्षारोपण आरंभून हरित पट्ट्याचे संरक्षण करण्यासाठी यशस्वीरित्या मोहीम १९७७ पासून राबविली. त्यांच्या कार्यासाठी शांततेचे प्रतिष्ठित 'नोबेल' प्राप्त करणाऱ्या, त्या आफ्रिकेतल्या पहिल्या महिला ठरल्या होत्या.

इंग्लंडच्या जैन बुडाल यांनी, कुमार अवस्थेत टांझानियातल्या जंगलात असणाऱ्या चिंपांझींच्या सामाजिक आणि कौटुंबिक स्नेहबंधाचे संशोधन करून त्यांच्या संरक्षणासाठी मोहीम राबविली. 'रूट्स ॲण्ड शूट्स' संस्थेमार्फत या क्षेत्रात साठ वर्षे त्या सक्रिय होत्या. डायना फोसी यांनी, आफ्रिकेतल्या रवांडात गोरिलाचे अस्तित्व आणि नैसर्गिक अधिवास सुरक्षित व्हावा, यासाठी मोहीम आरंभली. जंगली शाबुदाण्याची शिकार आणि जंगलतोडीच्या विरोधात लढताना त्यांची गूढरीत्या हत्या करण्यात आली. मरीना सिल्वा यांनी, ब्राझिलमधल्या पर्जन्य जंगलांचे रक्षण व्हावे, यासाठी १९८० पासून प्रतिकूल सामना करीत चळवळ चालू ठेवली. जगभरात पर्यावरण जागृती आणि

हृदयाचे आरोग्य जपायचे आहे? रोजच्या जीवनात करा महत्त्वाचे बदल

योग्य खाण्याच्या सवयी आणि दिनचर्या या एकूण आरोग्याच्या गुरुकिल्ल्या आहेत. पण अनेकदा आपण ते खूप हलके घेतो. कधी कधी आपत्कालीन परिस्थितीत दिनचर्या बरोबर न मिळणे ही वेगळी बाब आहे. पण उद्यापर्यंत गोष्टी पुढे ढकलून तुमचे समाधान होत असेल, तर लक्षात ठेवा की यामुळे गंभीर समस्या निर्माण होऊ शकतात. हृदय हा एक अवयव आहे ज्याचे निरंतर, योग्य कार्य जीवन टिकवून ठेवण्यासाठी आवश्यक आहे. सध्या धकाधकीचे आयुष्य आणि चुकीच्या खानपान शैली मुळे आरोग्याच्या अनेक समस्या उदभवत आहे. या मध्ये हृदयविकाराचा त्रास मुख्य आहे. हृदय निरोगी असणे खूप महत्त्वाचे आहे. आपण हृदयाला निरोगी ठेवण्यासाठी काही गोष्टींचा अवलंब करावा . तुम्ही दिनचर्या आणि आहार आखावा जेणे करून तुम्हाला आरोग्याशी संबंधित कोणत्याही समस्या होणार नाही.

अशा प्रकारे तुमच्या हृदयाची काळजी घ्या-

विश्रांती घ्या – सर्वप्रथम, हृदयाच्या आरोग्याबद्दल ताण देणे थांबवा कारण याचा हृदयावर वाईट परिणाम होऊ शकतो. थोडा विराम घ्या आणि शांतपणे तुम्हाला कशावर काम करायचे आहे त्याबद्दल नोट्स बनवा आणि नंतर हळू हळू त्याची अंमलबजावणी सुरू करा.

कुटुंबातील आजारांचा कोणताही इतिहास-

कुटुंबातील एखाद्याला हृदयविकार असेल तर तुम्हालाही तो असेलच असे नाही, पण त्याची शक्यता नेहमीच असू शकते. म्हणूनच, जर उच्च रक्तदाब, उच्च साखर, कोलेस्टेरॉल इत्यादी तुमच्या कुटुंबातील एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे जात असतील, तर तुम्ही लहानपणापासूनच तुमच्या दिनचर्येत आरोग्यदायी सवयींचा समावेश करणे महत्त्वाचे आहे. तसेच तुमची वैद्यकीय तपासणी वेळेवर करून घ्या. सर्वात चांगली गोष्ट म्हणजे आज जवळजवळ प्रत्येक हृदयविकारावर उपचार उपलब्ध आहेत आणि त्यानंतर माणूस आरामात सामान्य जीवन जगू शकतो. सतर्क राहिल्यास मनःशांतीने निरोगी जीवन जगू शकता. .

घोरण्यावर उपचार – घोरणे किंवा स्लीप एपनियाकडे दुर्लक्ष करू नका. जर तुम्हाला सतत झोपेचा त्रास होत असेल आणि घोरणे ही तुमची सवय झाली असेल तर डॉक्टरांचा सल्ला घ्या आणि त्यावर उपाय करा. स्लीप एपनियाच्या बाबतीत, तुमच्या वायुमार्गात अडथळा निर्माण होतो, ज्यामुळे श्वास घेण्यास अडथळा येतो. त्यामुळे रात्री झोपतानाही अनेकदा तुमचा श्वास थांबतो. यामुळे उच्च रक्तदाब, हृदयाची असामान्य लय आणि हृदय अपयश देखील होऊ शकते. तुमचे वजन जास्त असेल तर असे होण्याची दाट शक्यता असते.

वजन वाढण्यावर नियंत्रण– वजन, साखर, बीपी आणि कोलेस्ट्रॉलवर काटेकोर नियंत्रण ठेवा. ही अशी गोष्ट आहे जी बर्याच लोकांना माहित असते पण ती अंमलात आणायला विसरतात. ज्याप्रमाणे तुम्हाला दररोज अन्न खाणे, आंघोळ करणे इत्यादी आठवते, त्याचप्रमाणे वर नमूद केलेल्या नियंत्रणांना तुमच्या जीवनाचा एक भाग बनवा. पांढर्या पदार्थांचे सेवन कमी करा म्हणजे मीठ, साखर आणि तांदूळ, अधिक फायबर आणि ओमेगा -३ फॅटी ॲसिड सारख्या चांगल्या चरबीचा आहारात समावेश करा. संपूर्ण धान्य, संपूर्ण फळे, हिरव्या भाज्या इत्यादींचे सेवन करा.

तणाव घेऊ नका– तणावासारख्या परिस्थितींपासून शक्यतो दूर राहण्याचा प्रयत्न करा. हे तुमचे हृदय मोठ्या संकटात टाकू शकतात. यामध्ये ध्यान, संगीत इ. तुम्हाला मदत करू शकतात.

व्यायाम करा– रोज किमान १५ मिनिटे व्यायाम आणि मोकळ्या ताज्या हवेत दीर्घ श्वास घेणे चमत्कारासारखे काम करेल. यामुळे सुरळीत रक्ताभिसरण तर होईलच, शिवाय मेंदूला सकारात्मक ऊर्जा मिळेल आणि ते व्यवस्थित काम करू शकतील. मद्यपान किंवा सिगारेटचे सेवन करू नका -दारू किंवा सिगारेट कधीही कोणत्याही समस्येवर उपाय असू शकत नाही. त्यांचा हृदयाच्या आरोग्यावरही खूप वाईट परिणाम होतो. त्यांच्यापासून अंतर ठेवा किंवा त्यांचे सेवन कमी करा.

मानसाचा मूड ठरवणारे हार्मोन्स - डॉ.जगदीश टेकाळे

डॉ.जगदीश टेकाळे
मो. 9518551503
मो. 9545615352

आपल्या आजूबाजूला असणाऱ्या प्रत्येक व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वात काही ना काही वैशिष्ट्ये असतात, ज्यामुळे ती इतरांपेक्षा वेगळी ठरते. या मागील शास्त्रीय कारण म्हणजे आपल्या शरीरातील न्यूरोट्रांसमीटर्स आणि हार्मोन्स, जे मानवी वर्तनावर आणि मनःस्थितीवर थेट प्रभाव पाडतात. हे हार्मोन्स आणि न्यूरोट्रांसमीटर्स नेमके कसे काम करतात, याविषयी सविस्तर माहितीः मेंदूचे कार्य कसे चालते ? मानवी मेंदू एखाद्या संगणकाप्रमाणे (कॉम्प्युटर) कार्य करतो. मेंदूमध्ये काही विशेष संदेशवाहक असतात, जे एखाद्या वायरिंगप्रमाणे संपूर्ण शरीरात पसरलेले असतात. यांना न्यूरोट्रांसमीटर्स म्हटले जाते. यांच्या साहाय्याने मेंदू शरीराच्या विविध अवयवांपर्यंत संदेश पोहोचवतो. वाढते वय, गंभीर आजार किंवा औषधांचे दुष्परिणाम यामुळे मेंदूतील हे न्यूरोट्रांसमीटर्स हळूहळू कमी होऊ लागतात.

डोपामाइन : डोपामाइन हा एकाग्रता, स्मरणशक्ती, शिकण्याची क्षमता आणि समस्या निवारण कौशल्य वाढवणारा न्यूरोट्रांसमीटर्स आहे. यामुळे व्यक्तीला नवीन काम करण्याची प्रेरणा मिळते. एखादे उद्दिष्ट पूर्ण करताना हा हार्मोन वेगाने सक्रिय होतो. उत्तम झोपेसाठीही हा घटक उपयुक्त ठरतो. डोपामाइनची कमतरता निर्माण झाल्यास व्यक्ती नैराश्यात (डिप्रेशन) जाऊ शकते. व्यसनाच्या आहारी गेलेल्या लोकांमध्ये या हार्मोनची तीव्र कमतरता आढळते.

सेरोटोनिन : सेरोटोनिन हा सकारात्मक ऊर्जा देणारा हार्मोन आहे. भूक, झोप आणि लैंगिक इच्छा नियंत्रित करण्यात याची महत्त्वाची भूमिका असते. शरीरात सेरोटोनिनची पातळी योग्य असल्यास व्यक्ती आनंदी आणि कार्यक्षम राहते. मात्र, याची कमतरता नैराश्याला कारणीभूत ठरू शकते, तर याचे अतिरिक्त प्रमाण अति-उत्साह (हायपो-मेनिया) आणि तीव्र रागास कारणीभूत ठरते.

नॉर ड्रेनालिन: हा हार्मोन व्यक्तीमध्ये तत्काळ उत्साह आणि ऊर्जा निर्माण करतो. खेळाच्या मैदानावरील खेळाडू किंवा युद्धातील सैनिकांच्या मेंदूमध्ये याचे प्रमाण वाढते. हा हार्मोन रक्तदाब आणि हृदयाचे ठोके नियंत्रित ठेवतो, याची कमतरता जाणवल्यास थकवा येतो, तर अतिरिक्त प्रमाणामुळे उच्च रक्तदाबाचा (हाय बीपी) त्रास संभवतो.

ऑक्सिटोसिन: ऑक्सिटोसिन हा विश्वास, प्रेम, काळजी आणि आशेच्या भावनेशी जोडलेला हार्मोन आहे. मानवासह सर्व सस्तन प्राण्यांमध्ये हा आढळतो. महिलांच्या प्रसूतीदरम्यान हा हार्मोन नैसर्गिकरीत्या स्रवतो, ज्यामुळे प्रसूती सुलभ होते. तसेच स्तनपानासाठी लागणाऱ्या दूधनिर्मितीतही याची मुख्य भूमिका असते. बाळाच्या जन्मानंतर आई आणि बाळामधील भावनिक नाते याच हार्मोनमुळे घट्ट होते. याची पातळी कमी झाल्यास नैराश्य येऊ शकते, तर सकारात्मक विचारांमुळे याचे प्रमाण वाढते.

एंडॉर्फिन्स: मेंदूतील पिट्युटरी ग्रंथीमधून सुमारे २० प्रकारचे एंडॉर्फिन्स स्रवतात. हे शरीरासाठी नैसर्गिक पेनकिलर (वेदनानाशक) म्हणून काम करतात. शरीराला कुठेही वेदना झाल्यास किंवा आणीबाणीच्या प्रसंगी मेंदू मोठ्या प्रमाणात एंडॉर्फिन तयार करतो, ज्यामुळे वेदना सहन करण्याची ताकद मिळते. महिलांना प्रसूती वेदना सहन करण्याचे बळही याच हार्मोनमुळे मिळते.

कोर्टिसोल: शरीरातील आनंदी हाम्बत्सची पातळी कमी होते, तेव्हा कोर्टिसोल सक्रिय होतो. यामुळे तात्पुरता मानसिक ताण निर्माण होतो, मात्र ही प्रक्रिया व्यक्तीला समस्येवर तोडगा शोधण्यास प्रवृत्त करते. प्रजननक्षमतेशी जोडलेले हार्मोन्स : पौगंडावस्थेत मुर्तीच्या शरीरात इस्ट्रोजेन आणि प्रोजेस्टेरॉन हे हार्मोन्स सक्रिय होतात, ज्यामुळे शारीरिक विकास होतो आणि त्यांच्यात संवेदनशीलता व संयम यांसारखे गुण विकसित होतात. मुलांमध्ये टेस्टोस्टेरॉन हा हार्मोन नेतृत्व आणि धाडस यांसारखे पुरुषी गुण विकसित करतो. स्त्री आणि पुरुष दोघांमध्येही विरुद्ध लिगाशी संबंधित हार्मोन्स मर्यादित प्रमाणात सक्रिय असतात, जे व्यक्तिमत्त्वाला समतोल ठेवतात.

थायरॉईड आणि मनःस्थिती : घशातील थायरॉईड ग्रंथीमधून ढ३ आणि ढ४ हार्मोन्स स्रवतात. याचे प्रमाण कमी झाल्यास नैराश्य, वजन घटणे, सुस्ती आणि बद्धकोष्ठता यांसारख्या समस्या उद्भवतात. प्रमाण वाढल्यास चिडचिड, घबराट, वजन वाढणे, निद्रानाश आणि जुलाब यांसारखे त्रास होऊ शकतात. महिलांमध्ये प्रामुख्याने हायपोथायरॉईडीझम ची (हार्मोनची कमतरता) समस्या मोठ्या प्रमाणावर आढळते.असे मत डॉ.जगदीश श्रीराम टेकाळे एम.बी.बी.एस., एम.डी.मानसोपचार तज्ज्ञ (गोल्ड मॅडेलिस्ट)न्युरो सायकियाट्रिस्ट, व्यसनमुक्ती तज्ज्ञ, सेक्सोलॉजीस्ट यांनी व्यक्त केले. डॉ.जगदीश टेकाळे महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या रविवारी बीड शहरात साई(गावते कॉम्प्लेक्स, डी.पी.रोड,डॉक्टर लाईन,बस स्टॅण्डच्या पाठीमागे येथे उपलब्ध असतात.

सांधेदुखीचा त्रास कमी करण्यासाठी मे घरगुती पेय

चुकीची जीवनशैली, व्यायामाचा अभाव आणि आहाराकडे दुर्लक्ष यामुळे अगदी लहान वयातही सांधेदुखीचा त्रास जाणवतो. कधीकधी ही वेदना इतकी तीव्र होते की कोणतेही काम करणे कठीण होऊन बसते.

जर तुम्हाला या समस्येचा त्रास होत असेल, तर तुम्ही तुमच्या आहारात तूप आणि हळदीच्या पाण्याचा समावेश केला पाहिजे. हे मिश्रण विचित्र वाटू शकते, परंतु ते हाडांच्या आरोग्यासाठी खूप फायदेशीर ठरते. चला जाणून घेऊया की हे पेय कसे बनवले जाते आणि ते हाडांच्या आरोग्यासाठी कसे फायदेशीर ठरते.

साहित्य : गरम पाणी - १ ग्लास, हळद - अर्धा चमचा, गाईचे तूप - अर्धा चमचा हळदीचे पेय बनवण्याची कृती : सर्वप्रथम एक ग्लास गरम पाणी घ्या. त्यात हळद आणि तूप घालून मिसळा. पौष्टिक हळदीचे पेय तयार आहे. ते घोट घोट करून हळूहळू प्या. **हळद आणि तुपाचे पेय पिण्याचे फायदे :** हळदीचे पाणी प्यायल्याने सांधेदुखीपासून लक्षणीय आराम मिळू शकतो. हळदीमध्ये दाह कमी करणारे अँटीऑक्सिडंट गुणधर्म असतात.तुपामुळे सांध्यांमध्ये स्नेह टिकून राहतो आणि लवचिकता सुधारते. तूप व्हिटॅमिन डीचा उत्तम स्रोत आहे, ज्यामुळे कॅल्शियमचे शोषण वाढते.

सकाळी रिकाम्या पोटी कोमट पाणी पिण्याचे फायदे

१. शरीरातील विषारी द्रव्ये बाहेर टाकते: रात्रीच्या झोपेनंतर सकाळी उठल्यावर तुमचे शरीर विषारी द्रव्यांनी भरलेले असते. कोमट पाणी घाम किंवा लघवीद्वारे ही विषारी द्रव्ये बाहेर टाकण्यास मदत करते. ते तुमच्या शरीरासाठी नैसर्गिक डिटॉक्स पेय म्हणून काम करते. सकाळी नियमितपणे कोमट पाणी प्यायल्याने यकृत आणि मूत्रपिंडांवरील अतिरिक्त ताणही कमी होतो.

२. पचनक्रिया सुधारते: कोमट पाणी प्यायल्याने पोटातील गॅस, आम्लपित्त आणि बद्धकोष्ठता हळूहळू दूर होते. ते तुमच्या पचनसंस्थेला सक्रिय करते आणि आतड्यांमध्ये साचलेले मल बाहेर टाकण्यास मदत करते. जर तुम्हाला दररोज सकाळी शौचास जाण्यास त्रास होत असेल किंवा गॅसचा त्रास होत असेल, तर कोमट पाणी ही समस्या सोडवण्यासाठी मदत करू शकते.

३. वजन कमी करण्यास मदत करते: जर तुम्ही वजन कमी करण्याचा विचार करत असाल, तर सकाळी रिकाम्या पोटी एक ग्लास कोमट पाणी प्या. यामुळे तुमची चयापचय क्रिया (मेटाबॉलिझम) वाढते, ज्यामुळे तुमच्या शरीराला अधिक कॅलरीज जाळण्यास मदत होते. तुमच्या इच्छेनुसार, तुम्ही पाण्यात चिमूटभर दालचिनी पावडर किंवा लिंबाचे काही थेंब घालू शकता. यामुळे चरबी जाळण्याची प्रक्रिया आणखी वेगवान होईल.

४. त्वचेला चमक देते: कोमट पाणी प्यायल्याने त्वचा खोलवर स्वच्छ होते. त्यामुळे रक्ताभिसरण सुधारते, ज्यामुळे चेहऱ्यावर नैसर्गिक चमक येते. शिवाय, यामुळे मुरुमे, सुरकुत्या आणि कोरडेपणा कमी होतो. कोमट पाणी केवळ तुमच्या शरीराला आतूनच स्वच्छ करत नाही, तर तुमचे बाह्य सौंदर्यही वाढवते.

५. मासिक पाळीतील त्रासापासून आराम: मासिक पाळीच्या काळात महिलांना अनेकदा पोटदुखी आणि पेटके येतात. कोमट पाणी प्यायल्याने खूप आराम मिळू शकतो. त्यामुळे पोटाचे स्नायू शिथिल होतात आणि रक्तप्रवाह नियमित होतो, ज्यामुळे वेदना कमी होतात. ही पद्धत नैसर्गिक असून तिचे कोणतेही दुष्परिणाम नाहीत.

६. तणाव आणि थकवा कमी करते: कोमट पाणी प्यायल्याने शरीराला आराम मिळतो आणि तणावाची लक्षणे हळूहळू कमी होतात. यामुळे नसा शांत होतात आणि मेंदूला होणारा ऑक्सिजनचा पुरवठा सुधारतो. शांत मन आणि सक्रिय शरीर तुमचा संपूर्ण दिवस चांगला बनवू शकते.

७. नाक चोंदणे आणि घसादुखीपासून आराम मिळतो: जर तुम्हाला वारंवार सर्दी किंवा घसादुखीचा त्रास होत असेल, तर कोमट पाणी हा एक रामबाण उपाय आहे. त्यामुळे कफ पातळ होतो आणि श्वासमार्ग मोकळा होतो, ज्यामुळे श्वास घेणे सोपे होते. हवामानातील बदलांदरम्यान ही सवय अत्यंत फायदेशीर ठरू शकते.

थोडक्यात

अल्कोहोलिक्स अनॉनिमसच्या वतीने बीडमध्ये मद्यपान विषयी जनजागरण मोहीम

बीड (प्रतिनिधी):- मद्यपानाच्या व्यसनामुळे व्यक्तीच्या शारीरिक, मानसिक आरोग्यासह कौटुंबिक आणि सामाजिक जीवनावर होणाऱ्या दुष्परिणामांबाबत जनजागृती करण्यासाठी अल्कोहोलिक्स ॲनॉनिमस परिवर्तन अंतर समूह, बीड यांच्या वतीने ३१ ऑक्टोबर जनजागृती मोहीम आयोजित आणि १ नोव्हेंबर रोजी विशेष करण्यात आली आहे. 'मद्यपाण एक आजार' या विषयावर आधारित या मोहिमेत शासकीय अधिकारी, कर्मचारी, न्यायाधीश, वकील, डॉक्टर, विद्यार्थी, पत्रकार आणि विविध सामाजिक घटकांशी संवाद साधण्यात येणार आहे. अल्कोहोलिक्स अनॉनिमस ही मद्यपानाच्या व्यसनातून मुक्त होण्यासाठी परस्पर सहकार्याच्या माध्यमातून कार्य करणारी संस्था आहे. ही संस्था विना मूल्य काम करते. या संस्थेच्या वतीने ३१ ऑक्टोबर आणि १ नोव्हेंबर असे दोन दिवस वेगवेगळ्या घटकांसाठी मद्यपान एक आजार या विषयावर विशेष मोहिम आयोजीत केली असुन प्रसिध्द मानसोपचार तज्ज्ञ डॉ. आशिष देशपांडे हे प्रमुख मार्गदर्शन करणार आहेत. ३१ ऑक्टोबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी सकाळी ११ वाजता न्यायालयामध्ये दुपारी २ वाजता आयएमए हॉलमध्ये, संध्याकाळी ७ वाजता तसेच आदित्य वैद्यकीय महाविद्यालयात सायंकाळी ५ वाजता कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असुन शहरातील पत्रकार व इतर सदस्यांसाठी १ नोव्हेंबर रोजी दुपारी १२ वाजता तर रोटरी क्लबसाठी सकाळी ९ वाजता विशेष मार्गदर्शन आयोजीत करण्यात आले आहे.

चिंचोटी शाळेत बालकांना स्वसंरक्षण सायबर सुरक्षेबाबत मार्गदर्शन

वडवणी (प्रतिनिधी):- तालुक्यातील चिंचोटी येथी जि.प.प्रा. शाळेत गुरुवारी (दि.२९) 'सुरक्षित बचपन अभियान' अंतर्गत बालकांसाठी जनजागृती कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई व जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, बीड यांच्या आदेशान्वये तालुका विधी सेवा समिती, वडवणी यांच्या माध्यमातून पार पडलेल्या या कार्यक्रमात विधी विद्यार्थी दीपक तिडके यांनी विद्यार्थ्यांना बालसुरक्षेबाबत मार्गदर्शन केले. कार्यक्रमाची प्रस्तावना शाळेतील शिक्षक शेंडगे सर यांनी केली. 'प्रत्येक मुलाचे बालपण, आपल्या सर्वांची जबाबदारी' हा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला. यावेळी तिडके यांनी विद्यार्थ्यांना गुड टच-बँड टच, बालकांचे लैंगिक शोषण, तसेच अशा प्रसंगी घ्यावयाची खबरदारी याबाबत सोप्या भाषेत माहिती दिली. घर, शाळा, शिकवणी वर्ग, स्कूल बस, खेळाचे मैदान, प्रवासादरम्यान किंवा परिचित व्यक्तींच्या ठिकाणी असुरक्षित परिस्थिती निर्माण झाल्यास काय करावे, याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. तसेच अडचणीच्या प्रसंगी मदत कशी मागावी, याची माहितीही देण्यात आली. न्यायालयीन कर्मचारी विजेंद्र निवृत्ती कांबळे यांनी विद्यार्थ्यांना 'आपले शरीर, आपली जबाबदारी' या विषयावर मार्गदर्शन केले. बालसुरक्षेचे तीन सुवर्णनियम नाही म्हणा, दूर जा, विश्वासू व्यक्तीला सांगून टाका यांची माहिती देण्यात आली. तसेच पॉक्सो कायदा, बालकांसाठी कायदेशीर सेवा युनिट आणि न्यायालयीन प्रक्रियेबाबत विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात आले.

डॉ. सोनाली सानप यांचे एम.डी. परीक्षेत सूयश

बीड (प्रतिनिधी):- बीड शहरातील साई बाबा हॉस्पिटलचे डॉ. प्रशांत सानप यांच्या पत्नी डॉ. सोनाली सानप यांनी एम.डी. माक्रोबाँयाँलॉजी च्या अंतिम परीक्षेत त्यानीं यश संपादन केले आहे. त्यांचं मूळ गाव जालना असून १२ वी पर्यंत चे शिक्षण

प्रथम श्रेणीत देऊळगाव राजा जिल्हा बुलढाणा येथे पूर्ण केले. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय नागपूर येथून एम.बी.बी.एस.ची पदवी घेतल्यानंतर महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेद्वारा त्यांची वैद्यकीय अधिकारी वर्ग-१ पदी निवड झाली. त्यांनी घनसावंगी जिल्हा जालना, तालुका शिरूर - बीड व नाळवंडी ता. बीड येथे उत्कृष्ट आरोग्य सेवा दिली. तर संभाजीनगर येथिल शासकीय (घाटी) महाविद्यालयात नीट च्या परीक्षेत घवघवीत यश संपादन करून. एम. डी. माक्रोबाँयाँलॉजी प्रेवेश मिळवला व एम.डी. परीक्षेत यश संपादन केले. बीड जिल्ह्यातील त्या एकमेव एम.डी. माक्रोबाँयाँलॉजी महिला डॉक्टर आहेत. त्यांचं जाणीव प्रतिष्ठान च्या वतीने ॲड. विवेकानंद सानप, तुकाराम पवार, डॉ. शहादेव जगताप, डॉ. सुरज कोकणे, डॉ. शिवाजी सानप, डॉ. गणेश वाघमारे, डॉ. अविनाश देशपांडे यांनी अभिनंदन केले आहे.

वनहक्क दावे निकाली काढण्याची व वनपट्टे वाटपाची मोहीम आता १५ डिसेंबरपर्यंत

बीड (प्रतिनिधी):- राज्यातील पात्र वनपट्टेधारकांचे वैयक्तिक व सामूहिक वनहक्क दावे अंतिम करण्यासह मंजूर वनपट्टे वाटपाची विशेष मोहीम आता १५ डिसेंबर २०२६ पर्यंत सुरू राहणार आहे. या मोहिमेद्वारे सर्व स्तरांवरील प्रलंबित वनहक्क दावे निकाली काढून पात्र लाभार्थ्यांना वनहक्क अभिलेख उपलब्ध करून देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. यासंदर्भात महसूल विभागाने परिपत्रक निर्गमित केले आहे. यापूर्वी १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत विशेष कालबद्ध वनहक्क मोहीम राबविण्यात आली होती. मात्र, वनहक्क दावे अंतिम करण्याची प्रक्रिया आणि मंजूर वनपट्टे वाटपाची कार्यवाही पूर्ण करण्यासाठी या मोहिमेचा कालावधी वाढविण्यात आला आहे. या मोहिमेत ग्रामस्तरीय, उपविभागस्तरीय आणि जिल्हास्तरीय वनहक्क समित्यांकडे प्रलंबित असलेले सर्व वैयक्तिक व सामूहिक वनहक्क दावे समाविष्ट करण्यात येणार आहेत. दाव्यांची अभिलेखीय तपासणी, आवश्यक स्थळपडताळणी आणि कायद्यातील तरतुदींनुसार कार्यवाही करून निर्धारित मुदतीत अंतिम निर्णय घेण्याच्या सूचना संबंधित समित्यांना देण्यात आल्या आहेत.

एकल महिला सर्वेक्षणासाठी अवघे दोन दिवस शिल्लक

बीड (प्रतिनिधी):- बीड शहरातील विधवा, परित्यक्ता, घटस्फोटित, अविवाहित तसेच इतर एकल महिलांचे सर्वेक्षण पूर्ण करण्यासाठी आता अवघे दोन दिवस शिल्लक राहिले असून, दि.३१ ऑक्टोबर २०२६ ही नोंदणीची अंतिम तारीख आहे. त्यामुळे बीड नगरपरिषद हद्दीतील सर्व नगरसेवक व नगरसेविकांनी आपापल्या प्रभागात त्या-त्या महिलांना जागृत करावे किंवा तातडीने सर्वेक्षण कॅम्प आयोजित करावेत, तसेच प्रत्यक्ष महिलांच्या भेटी घेऊन त्यांची नोंदणी पूर्ण करण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन महिला व बालकल्याण समितीच्या सभापती आरती रंजीत बनसोडे यांनी केले आहे.

आ. विजयसिंह पंडित यांच्या नेतृत्वाखाली तसेच नगराध्यक्ष प्रेमलता पारवे, उपनगराध्यक्ष विनोद मुळूक, शेख मुजीब आणि गटनेते फारुक पटेल यांच्या मार्गदर्शनाखाली, सर्व नगरसेवकांच्या साहाय्याने सभापती आरती बनसोडे यांनी हे काम हाती घेतले आहे. बीड शहरात एकल महिला सर्वेक्षणाचे काम सुरू आहे.

मात्र, अनेक महिलांची अद्याप नोंदणी झालेली नसण्याची शक्यता लक्षात घेता, अंतिम मुदतीपूर्वी सर्व पात्र महिलांची माहिती संकलित करणे आवश्यक आहे. विधवा, परित्यक्ता, घटस्फोटित, अविवाहित आणि विविध कारणांमुळे एकट्याने जीवन जगणाऱ्या महिलांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळवताना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. आवश्यक नोंदणी आणि माहिती उपलब्ध नसल्याने अनेक पात्र महिला योजनांच्या लाभापासून वंचित राहण्याची शक्यता असते. ही बाब लक्षात घेऊन सभापती आरती बनसोडे यांनी एकल महिला सर्वेक्षणाचा पुढाकार घेतला आहे. अंतिम मुदतीपूर्वी नोंदणी पूर्ण करण्याचे आवाहन दि.३१ ऑक्टोबर ही सर्वेक्षणाची अंतिम तारीख असल्याने नगरसेवक व नगरसेविकांनी आता विलंब न करता प्रभागनिहाय कॅम्प आयोजित करावेत. तसेच आपल्या परिसरातील पात्र महिलांपर्यंत पोहोचून त्यांची माहिती संकलित करावी. एकही पात्र महिला नोंदणीपासून वंचित राहू नये, यासाठी लोकप्रतिनिधी, महिला बचत गट आणि महिला व बालकल्याण समिती यांनी समन्वयाने काम करणे गरजेचे आहे. सर्वांनी या सामाजिक उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन आरती रंजीत बनसोडे व रंजीत बनसोडे यांनी केले आहे.

प्रत्येक मुलाचे बालपण सुरक्षित ठेवणे ही समाजाची सामूहिक जबाबदारी- न्या.एस.आर.पाटील

पाटोदा (प्रतिनिधी):- बालकांचे लैंगिक शोषण रोखणे, त्यांना स्वतःच्या सुरक्षिततेबाबत जागरूक करणे आणि संकटाच्या प्रसंगी मदत मिळविण्यासाठी योग्य पावले उचलण्याचा आत्मविश्वास निर्माण करणे, ही काळाची गरज आहे. प्रत्येक बालकाला सुरक्षित वातावरणात जगण्याचा अधिकार असून, त्याच्या संरक्षणाची जबाबदारी संपूर्ण समाजाची आहे. असे प्रतिपादन दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) एस. आर. पाटील यांनी केले.

जिल्हा न्यायाधीश सुराणा साहेब आणि जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव सय्यद वहाब साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली तालुका विधी सेवा समिती, पाटोदा यांच्या वतीने २१ ऑक्टोबर २०२६ रोजी पाटोदा येथील लिटल फ्लावर इंग्लिश स्कूलमध्ये आयोजित 'सुरक्षित बचपन अभियान' अंतर्गत जनजागृती कार्यक्रमात त्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना बोलत होत्या. यावेळी शाळेचे प्राचार्य पठाण सर, शिक्षकवृंद आणि विद्यार्थी उपस्थित होते.

'जागरूकता, सुरक्षा आणि संरक्षण हा प्रत्येक मुलाचा अधिकार' हा कार्यक्रमाचा प्रमुख विषय होता, तर 'प्रत्येक मुलाचे बालपण, आपल्या सर्वांची जबाबदारी' हा या अभियानाचा मुख्य संदेश होता. बालकांना त्यांच्या हक्कांची जाणीव करून देणे, संभाव्य धोके ओळखण्यास शिकवणे, बालकांवरील अत्याचार आणि शोषण रोखण्यासाठी आवश्यक माहिती देणे तसेच अडचणीच्या प्रसंगी मदत कशी मिळवावी, याबाबत विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण करणे, हा कार्यक्रमाचा प्रमुख उद्देश होता. महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई आणि जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, बीड यांच्या निर्देशानुसार राबविण्यात येणाऱ्या या अभियानाच्या माध्यमातून बालकांच्या सुरक्षिततेचा विषय विद्यार्थ्यांसमोर सोप्या आणि समजण्याजोग्या पद्धतीने मांडण्यात आला. बालकांना सुरक्षित वातावरण मिळणे, त्यांच्याशी होणारे गैरवर्तन वेळीच ओळखता येणे आणि अशा प्रकारांना प्रतिबंध करण्यासाठी योग्य माहिती मिळणे आवश्यक असल्याचे या उपक्रमातून अधोरेखित करण्यात आले. गुड टच-बॅड टचबाबत प्रात्यक्षिकातून मार्गदर्शन कार्यक्रमात विद्यार्थ्यांना गुड टच आणि बँड टच यातील फरक प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून समजावून सांगण्यात आला. आपल्या शरीराच्या वैयक्तिक मर्यादा काय आहेत, कोणत्या प्रकारचा स्पर्श अयोग्य ठरू शकतो आणि एखाद्या व्यक्तीच्या वर्तनामुळे अस्वस्थ वाटल्यास काय करावे, याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. चुकीच्या स्पर्शाला विरोध करणे, अशा प्रसंगी तेथून सुरक्षित ठिकाणी जाणे आणि घडलेला प्रकार विश्वासू पालक, शिक्षक किंवा अन्य जबाबदार व्यक्तीला सांगणे, याचे महत्त्व विद्याथ्यर्थ्यांना पटवून देण्यात आले. बालकांवरील लैंगिक शोषण म्हणजे काय, मुलांना कोणत्या प्रकारे गैरवर्तनाचा सामना करावा लागू शकतो आणि अशा प्रकारांपासून स्वतःचे संरक्षण कसे करावे, याची माहितीही सोप्या भाषेत देण्यात आली. कोणत्याही व्यक्तीने अनुचित वर्तन केल्यास त्यामध्ये बालकाची कोणतीही चूक नसते आणि अशा प्रसंगी मदत मागण्यास घाबरू नये, हा महत्त्वपूर्ण संदेश विद्यार्थ्यांना देण्यात आला. घरापासून प्रवासापर्यंत प्रत्येक ठिकाणी सतर्क राहण्याचे आवाहन बालकांना केवळ शाळेतच नव्हे, तर दैनंदिन जीवनातील विविध ठिकाणी सुरक्षिततेबाबत जागरूक राहणे आवश्यक आहे. घर, शाळा, शिकवणी वर्ग, स्कूल बस, खेळण्याचे मैदान, रहदारीचे रस्ते, शेजाऱ्यांची घरे, नातेवाइकांची घरे आणि प्रवासाची साधने अशा विविध ठिकाणी एखाद्या व्यक्तीकडून गैरवर्तन झाल्यास काय करावे, याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

प्रत्येक बालक रहावे सुरक्षित; विधी सेवा प्राधिकरणातर्फे सुरक्षीत बचपण अभियान

बीड (प्रतिनिधी):- जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, बीड यांच्या वतीने मौजे पिंपळवाडी येथील पिंपळवाडी हायस्कुल पिंपळवाडी येथील विद्याथ्र्यांसाठी विशेष कायदेविषयक मार्गदर्शन व जनजागृती शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले. या शिबिरात वाढती सायबर गुन्हेगारी, सोशल मीडियाचे दुष्परिणाम, बालविवाह, बालकामगार, बाललैंगीक अत्याचार, भिक्षा मागणारे बालके, मोफत विधी सेवा आणि बालकांचे मानसिक आरोग्य व मोबाईल व्यसन

यांसारख्या गंभीर व महत्त्वाच्या विषयांवर विद्यार्थ्यांना सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. हा कार्यक्रम प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष न्या. दिनेश पी. सुराणा आणि वरिष्ठ दिवाणी न्यायाधीश तथा प्राधिकरणाचे सचिव न्या. डॉ. वहाब ए. सय्यद यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अधिक्षक एस टी. शिंदे व अधिकार मित्र तथा बाल हक्क कार्यकर्ते तत्वशील कांबळे, शाळेचे मुख्याध्यापक प्रदीप जगताप, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी हे उपस्थीत होते. यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना शिंदे म्हणाले की, सध्याच्या तंत्रज्ञानाच्या युगात इंटरनेट व मोबाईलचा वापर वाढल्यामुळे सायबर क्राई क्राईम चे प्रमाण कमालीचे वाढले आहे. अनेकदा किशोरवयीन मुले अज्ञानापोटी किंवा मोहापायी अशा गुन्ह्यांत अडकतात. तत्वशील कांबळे म्हणाले की, सोशल मीडियाचा अनिर्बंध वापर विद्यार्थ्यांचे मोठे शैक्षणिक नुकसान करत असून, त्यामुळे मुलांचे अभ्यासातील लक्ष विचलित होत आहे आणि नकळतपणे गुन्हेगारी वृत्तीत वाढ होत असल्याचे त्यांनी नमूद केले. विद्यार्थ्यांनी अशा आभासी जगाच्या मोहात न पडता स्वतःचे भविष्य सुरक्षित करण्यासाठी करिअरचे योग्य नियोजन केले पाहिजे. आपल्या जिल्ह्यामध्ये उसतोडी व इतर कारणांमुळे बालविवाहाचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढत आहे. बालविवाह हा केवळ सामाजिक कलंक नसून तो कायद्याने गंभीर अपराध आहे, त्यामुळे बालविवाहाला ठामपणे विरोध केला पाहिजे. या प्रसंगी शाळेचे सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी वृंद आणि बहुसंख्येने विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते. शिबिराच्या यशस्वी आयोजनाबद्दल उपस्थितांनी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे आभार मानले. उपस्थितांनी या उपक्रमाचे कौतुक करत, अशा प्रकारच्या मार्गदर्शनामुळे समाजातील कायदेशीर जागरूकता नक्कीच वाढेल, अशी भावना व्यक्त केली.

सराटेवडगावात भरदिवसा घरफोडी; सोन्याचे दागिने लांबवले

आष्टी (प्रतिनिधी):- तालुक्यातील सराटेवडगाव येथे बंद घराचे कुलूप आणि कपाटाचे कुलूप तोडून चोरट्यांनी ३२ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने लंपास केले. या प्रकरणी अंभोरा पोलीस ठाण्यात अज्ञातांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला. सराटे वडगाव येथील रहिवासी बाळकृष्ण मोहन तरटे हे कामानिमित्त बाहेर गेले असताना, दि. २७ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ ते दुपारी ४:३० वाजेच्या सुमारास चोरट्यांनी त्यांच्या बंद घराला लक्ष्य केले. चोरट्यांनी मुख्य दरवाजाचे कुलूप तोडून घरात प्रवेश केला. त्यानंतर घरातील कपाटाचे लॉक तोडून आत ठेवलेले फिर्यादी यांच्या आईचे आणि भावजयीचे वापरातील जुने ३२ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने (अंदाजे किंमत १ लाख १२ हजार रुपये) चोरून नेले. कामावरून घरी परतल्यानंतर घरफोडीचा हा प्रकार उघडकीस आला. या प्रकरणी बाळकृष्ण तरटे यांच्या फिर्यादीवरून अंभोरा पोलीस ठाण्यात अज्ञातांविरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलीस अधिक तपास करत आहेत.

'सुरक्षित बचपन अभियान' उत्साहात

शिरूर (प्रतिनिधी):- शिरूर कासार तालुक्यात महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई आणि जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, बीड यांच्या निर्देशानुसार २९ ऑक्टोबर रोजी 'सुरक्षित बचपन अभियान' राबविण्यात आले. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, राक्षसभुवन व कोळवाडी तसेच सिंदफना आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना जनजागृतीपर मार्गदर्शन करण्यात आले. तालुका विधी सेवा समितीचे अधिकार मित्र (पी.एल.व्ही.) सतीश मुरकुटे आणि लक्ष्मी शिंदे यांनी विद्यार्थ्यांना 'गुड टच आणि बॅड टच', बालसुरक्षा आणि स्वतःच्या शरीराच्या सुरक्षिततेबाबत सोप्या भाषेत माहिती दिली. अनुचित प्रकार घडल्यास मदत कशी घ्यावी आणि चाइल्ड हेल्पलाइन क्रमांक १०९८ वर संपर्क कसा साधावा, याबाबतही मार्गदर्शन करण्यात आले. राक्षसभुवन येथील कार्यक्रमाला मुख्याध्यापक डॉ. विठ्ठल जाधव, अनंत कराड, नलिनी ढाकणे-खरमाटे, लता बडे, बाबासाहेब गायके आणि मीना भिलारे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संतोष रंधवे यांनी केले. विद्यार्थ्यांनी या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

आदित्य महाविद्यालयाची माजलगाव धरणाला भेट

व्यवस्थापन, अभियांत्रिकी तत्त्वांचे मिळवले प्रत्यक्ष घडे

बीड (प्रतिनिधी):- आदित्य इंजिनिअरिंग कॉलेज, बीड येथील सिव्हिल इंजिनिअरिंग विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांच्या व्यावहारिक ज्ञानाला चालना देण्यासाठी २६ ऑक्टोबर रोजी माजलगाव धरणाची शैक्षणिक भेट आयोजित करण्यात आली होती. यावेळी विद्यार्थ्यांनी धरणाची भव्य संरचना, आधुनिक बांधकाम तंत्रज्ञान, जलसंवर्धन पद्धती, पाणीसाठा व त्याचे नियोजनबद्ध व्यवस्थापन तसेच सिव्हिल इंजिनिअरिंगच्या दृष्टीने धरणांचे महत्त्व या सर्व बाबींचे प्रत्यक्ष ज्ञान विद्यार्थ्यांनी घेतले.

ही शैक्षणिक भेट आदित्य शिक्षण संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ. आदित्य सारडा व संचालिका डॉ. आदिती सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आली होती. माजलगाव धरणावर पोहोचल्यानंतर तेथील उपअभियंता शीतल माने आणि एस. एम. शेख यांनी विद्यार्थ्यांशी सविस्तर संवाद साधला. त्यांनी धरणाची कार्यप्रणाली, संरचनात्मक वैशिष्ट्ये जलसाठा व वितरण प्रणाली आणि जलसंपत्ती व्यवस्थापनाच्या विविध तांत्रिक पैलूंबद्दल सखोल माहिती दिली. प्रत्यक्ष कार्यक्षेत्रात सिव्हिल इंजिनिअरिंगच्या तत्त्वांचा वापर कसा केला जातो, हे जाणून घेताना विद्यार्थी कमालीचे उत्सुक दिसले. महाविद्यालयाचे प्रा. डॉ. निलेश बी. बहादुरे आणि सिव्हिल इंजिनिअरिंग विभागप्रमुख डॉ. कृष्णा पंत यांचे विशेष सहकार्य या उपक्रमास लाभले. संपूर्ण अभ्यास भेटीचे यशस्वी नियोजन प्रा. अशोक चोरे यांनी केले. उपक्रम यशस्वी करण्यासाठी सिव्हिल इंजिनिअरिंग विभागातील सर्व प्राध्यापकांनी सहकार्य केले.

२ नोव्हेंबरच्या मोर्चात सहभागी व्हा- गंगाधर सरवदे

बीड (प्रतिनिधी): संपूर्ण राज्य दुष्काळाच्या खाईत होरपळलेले असताना, एकीकडे केंद्रीय कर्मचारी यांना महागाई भत्ता ३% वाढलेला असताना आमच्यावर मात्र, जुनी सेवा आणि जुनी पेन्शन यासाठी रस्त्यावर येऊन लढाईत करावी लागत आहे ही विद्यमान सरकारला जाणीव असावी. दोन नोव्हेंबरच्या या मोर्चामध्ये आपण सर्वच जे जुने पेन्शन पासून वंचित आहेत त्यांनी या मोर्चामध्ये सहभागी व्हावे असे आवाहन बीड जिल्हा शिक्षक भारतीचे प्रसिद्धीप्रमुख गंगाधर सरवदे यांनी आवाहन केले आहे.

याबाबत पुढे बोलताना गंगाधर सर्व दे म्हणाले की, आताच ज्या राज्यसभेच्या निवडणुका झालेल्या आहेत त्यामध्ये, मराठवाडा पदवीधर मतदार संघातून प्रतापसिंह पाटील, तसेच पुणे शिक्षक मतदार संघातून आमच्या विचारांचा निसटता पराभव झाला तरी ही आम्ही मात्र, लढाऊ शिक्षक नेते, मा. शिक्षक आमदार कपिल भाऊ पाटील यांच्या विचारावर ठाम असून, सर्वच अधिकारी कर्मचारी यांना जुनी पेन्शन सेवा मिळाली पाहिजे यासाठी, आझाद मैदान ते ऑगस्ट क्रांती मैदान नाना चौकातून निघालेला हा प्रचंड मोर्चा, एक इतिहास घडवील असा माझा ठाम विश्वास आहे आपण, आपण दिवाळीच्या सुट्टीतला जो आनंद आहे, त्यापेक्षा आता घराबाहेर पडण्याची ही वेळ आहे. एकीकडे कंत्राटी कामगारांना

शासकीय सेवेमध्ये सामावून घेतले जात आहे., पण आम्ही २००१ पासून वस्ती शाळा शिक्षक म्हणून शिक्षणाची ज्योत तेवत ठेवलेली आहे आणि यासाठीच आमचा हा लढा अत्यंत महत्त्वाचा असून आपण देखील ज्यांना जुनी पेन्शन आणि ज्यांना जुनी सेवा हवी आहे, या दिवाळीच्या सुट्टीमध्ये आपण या विशाल महामोर्चा मध्ये सहभागी व्हावे असे आवाहन बीड जिल्हा शिक्षक भारतीचे प्रसिद्धीप्रमुख गंगाधर सरवदे यांनी केले आहे.

बीड सरकार

शुक्रवार दिनांक ३० ऑक्टोबर २०२६

टायगर ग्रुपचे राष्ट्रीय अध्यक्ष तानाजी भाऊ जाधव यांच्या वाढदिवसानिमित्त सेवायज्ञातून दुष्काळग्रस्त, गोरगरिबांना मदत

जिल्हाध्यक्ष राकेश जाधव यांचा सामाजिक उपक्रम

वाढदिवसाचा अनावश्यक खर्च टाळून दुष्काळग्रस्त, गरीब कुटुंबे आणि विद्यार्थ्यांसाठी खर्च करण्याचा संकल्प; दिवाळीत गरजूंना मदतीचा आधार!

बीड (सरकार): यावर्षी बीड जिल्ह्यासह राज्यातील अनेक भागांवर दुष्काळाचे सावट निर्माण झाले असून शेतकरी, शेतमजूर, गरीब आणि सर्वसामान्य कुटुंबांसमोर आर्थिक संकट उभे राहिले आहे. अशा कठीण परिस्थितीत वाढदिवसावर होणारा अनावश्यक खर्च, जल्लोष आणि दिखाऊ कार्यक्रम टाळून तोच पैसा दुष्काळग्रस्त, गोरगरीब कुटुंबे आणि गरजू विद्यार्थ्यांच्या मदतीसाठी खर्च करण्याचा सामाजिक संकल्प टायगर ग्रुपचे बीड जिल्हाध्यक्ष राकेश जाधव यांनी केला आहे. टायगर ग्रुपचे संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. तानाजी भाऊ जाधव यांच्या २ नोव्हेंबर रोजी असलेल्या वाढदिवसानिमित्त जिल्हाभरात आठवडाभर विविध सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून मदतीचा सेवायज्ञ राबविण्यात येत आहे.

वाढदिवस म्हणजे केवळ जल्लोष, हारतुरे, सत्कार आणि मोठे कार्यक्रम नव्हेत, तर समाजातील गरजू घटकांच्या जीवनात आनंद निर्माण करण्याची संधी आहे, या विचारातून राकेश जाधव यांनी हा उपक्रम हाती घेतला आहे. यावर्षी दुष्काळाची गंभीर परिस्थिती लक्षात घेता वाढदिवस साजरा करण्यासाठी होणारा खर्च टाळून तोच निधी गरजूंच्या मदतीसाठी वापरण्यात येणार आहे. विशेषतः दुष्काळामुळे आर्थिक अडचणीत सापडलेल्या कुटुंबांना, गोरगरीब विद्यार्थ्यांना आणि निराधार नागरिकांना या माध्यमातून मदतीचा हात दिला जाणार आहे.

सर्वात मोठा सण म्हणून ओळखल्या जाणाऱ्या दिवाळीच्या पार्श्वभूमीवर अनेक गरीब कुटुंबांना आर्थिक परिस्थितीमुळे मुलांसाठी शैक्षणिक साहित्य, घरातील किराणा आणि दैनंदिन गरजेच्या वस्तू खरेदी करणेही कठीण झाले आहे. अशा परिस्थितीत त्यांच्या दिवाळीत आनंदाचे क्षण निर्माण व्हावेत, मुलांच्या शिक्षणात आर्थिक अडचण येऊ नये आणि संकटाच्या काळात त्यांना आधार मिळावा, या उद्देशाने टायगर ग्रुपने सामाजिक बांधिलकी जपण्याचा पुढाकार घेतला आहे. वाढदिवसाचा खर्च स्वतःच्या उत्सवावर न करता समाजातील गरजू घटकांवर खर्च करण्याचा हा उपक्रम माणुसकीचा संदेश देणारा ठरत आहे.

या सेवायज्ञांतर्गत विविध शाळांमधील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप, जिव्हाळा बेघर निवारा केंद्रात अन्नदान, स्नेहसावली बालघर व वृद्धाश्रम येथे १५ दिवस पुरेल इतके किराणा साहित्य, तसेच जिल्हा रुग्णालयातील रुग्णांना फळवाटप करण्यात येणार आहे. यासोबतच जिल्हाभरातील गोशाळांमध्ये जनावरांसाठी चारा, शासकीय रुग्णालयांमध्ये रुग्णांना खाऊवाटप आणि गरजू महिलांना साड्यांचे वाटप अशा विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

या उपक्रमातून केवळ अन्नधान्य किंवा साहित्याचे वाटप न करता गरजू कुटुंबांना सणाचा आनंद मिळावा, विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर शिक्षणाची उमेद फुलावी आणि निराधार व्यक्तींना आपलेपणाची जाणीव व्हावी, यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत. दुष्काळाच्या झळा सोसणाऱ्या कुटुंबांसाठी दिवाळीच्या काळात मिळणारी ही मदत निश्चितच दिलासादायक ठरणार आहे.

टायगर ग्रुपची सेवाभावी परंपरा

टायगर ग्रुप हा केवळ संघटनात्मक कार्यापुरता मर्यादित न राहता अनाथ, निराधार, गोरगरीब, दिव्यांग, दुर्बल आणि संकटग्रस्त नागरिकांच्या मदतीसाठी राज्यभर सातत्याने कार्यरत असल्याचे या उपक्रमातून पुन्हा अधोरेखित होत आहे. यापूर्वीही विविध सामाजिक संकटांच्या काळात गरजूंच्या मदतीसाठी टायगर ग्रुपने पुढाकार घेतला आहे. समाजातील शेवटच्या घटकापर्यंत मदत पोहोचवणे आणि अडचणीत असलेल्या नागरिकांच्या चेहऱ्यावर आनंद फुलवणे, हीच टायगर ग्रुपची सेवाभावी भूमिका राहिली आहे.

राष्ट्रीय अध्यक्ष तानाजी भाऊ जाधव यांच्या वाढदिवसानिमित्त राबविण्यात येणारा हा सेवायज्ञ केवळ वाढदिवसाचा कार्यक्रम न राहता सामाजिक संवेदनशीलता, माणुसकी आणि सामाजिक उत्तरदायित्वाचा आदर्श निर्माण करणारा उपक्रम ठरत आहे. स्वतःच्या वाढदिवसाचा खर्च टाळून तोच पैसा दुष्काळग्रस्त, गोरगरीब आणि विद्यार्थ्यांच्या हितासाठी वापरण्याचा राकेश जाधव यांचा संकल्प समाजाप्रती असलेली बांधिलकी अधोरेखित करणारा आहे. उत्सवापेक्षा माणुसकी मोठी, या भावनेतून टायगर ग्रुपच्या माध्यमातून सुरू असलेल्या या सेवायज्ञामुळे गोरगरिबांच्या दिवाळीत आनंदाचा प्रकाश उजळणार आहे.

हे पत्रक मालक मुद्रक व प्रकाशक, संपादक आदोडे साहस पंढरीनाथ यांनी वरद प्रिंटर्स,जालना रोड,सहयोगनगर,बीड-४३११२२ येथे छापून कार्यालय सायं.दैनिक बीड सरकार संत नामदेवनगर, धानोरा रोड,बीड-४३११२२ येथे प्रकाशित केले आहे. मोबाईल नं.९८५०७९४७७९
(या अंकामधील छापलेल्या मजकुराशी संपादक/प्रकाशक सहमत असतीलच असे नाही- वाद बीड न्यायालया अंतर्गत)
Daily Evening Beed Sarkar Owner,Printer,Publisher and Editor Adode Sahas Pandhrinath has Varad Printers,Jalna Road Sahayog Nagar,Beed-431122 (Mahrashtra) and Published In Office Evening Daily Beed Sarkar,Sant Namdevnagar, Dhanora Road, Beed-431122. Mobile No. 9850794779
(The editors / publishers do not necessarily agree with the printed text in this issue - under the Beed Court of Appeals)